# सायबर सुरक्षेसाठी 'साय-फाय करंडक'

पुणे, दि. २८ (प्रतिनिधी) - सतत होणाऱ्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करण्यासाठी क्विक हिल फाउंडेशन आणि पुणे पोलिसांतर्फे २१ ते २५ डिसेंबर या कालावधीत 'साय-फाय करंडक २०१७'चे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेच्या बोधचिन्हाचे अनावरण पोलीस आयुक्त रश्मी शुक्ला, क्विक हिल टेक्नॉलॉजी लिमिटेड कंपनीचे वरिष्ठ कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक कैलास काटकर, सायबर गुन्हे विभागाचे मिलिंद पाटील, एक्सप्रेशन लॅबचे संचालक प्रदीप वैद्य यांच्या हस्ते करण्यात आले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राधिका फडके याप्रसंगी उपस्थित होत्या.

पुण्यातल्या भरतनाट्य मंदिर येथे रंगणाऱ्या अंतिम फेरीसाठी २८ संघांची निवड करण्यात आली आहे. 'सायबर जगातले मानवी आयुष्य-सोसीस्कर कितपत' या थीमवर आधारित नाटके नाट्यचित्रपटसृष्टीतल्या प्रसिद्ध कलाकारांसमोर सादर करण्याची संधी या निवडक संघांना मिळणार आहे. या स्पर्धेत महाराष्ट्राबाहेरील नाट्यकलावंतांना आपली कला सादर करण्याची संधीही देण्यात आली आहे. उत्सुक स्पर्धक सोशलमीडियावर आपली नाटके अपलोड करू शकतात व त्याची लिंग inffo@cyfiarts.com या ई-मेल आयडीवर पाठवू शकतात. ज्या स्पर्धकाला जास्त लाइक्स मिळतील, तो या स्पर्धेचा विजेता ठरणार आहे. द्वितीय क्रमांकाचे पारितोषिकतज्ज्ञ परीक्षकांकडून देण्यात येणार आहे.